| MHKO190002052017 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | २५/०४/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | :- | २५/०४/२०१७ |
| | निकाल दिनांक | :- | ०६/०४/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस, |
| | | | ०८ ११ ११ |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी आर.डि.शिंदे)

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०६ एप्रिल,२०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०/२०१७)** **(नि.क्र.४२/ब)**

गुन्हा नोंद क्र.४२/२०१६, पोलीस ठाणे राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सरकारी वकील श्री. के. एम. भोसले |
| आरोपी | | **अभिजीत रामचंद्र साळवी**<br>वय वर्ष –२१, व्यवसाय –<br>रा.शास्त्री सोसायटी, लिंगाडेमळा,इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड. श्री. ए. एस. हुपरीकर |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०६/०१/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०३/०४/२०१६ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २५/०४/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १९/०४/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०८/०१/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | ०६/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०६/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपी निर्दोषमुक्त. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अभिजीत रामचंद्र साळवी | नाही | २५/०४/२०१७ | भा.द.वि.कलम २७९, ३३७, ३३८,४२७ व मो.वा.का. कलम १८४ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
## (पारीत दिनांकः०६/०४/२०२६)

भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये आरोपीवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत खालील प्रमाणे**:-

२. दिनांक ०६/०१/२०१६ रोजी ०१.३० वाजताच्या सुमारास वर्दीदार सागर परशुराम शिंदे हे त्यांच्या ताब्यातील एस.टी.बस क्र.एम.एच.१४.बी.टी.३०६२ ही घेवुन मालवण आगार येथून कोल्हापूरकडे जात होते. त्यांची बस शेळप गावचे हद्दीतील वळणावर

आली असता आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने, हयगयीने व अविचाराने चालवुन समोरुन बसच्या चालक बाजुस धडक दिली. सदर अपघातामध्ये आरोपी स्वतः गंभीर जखमी होवुन दोन्ही वाहणांचे नुकसाणीस कारणीभूत ठरल्याचे एकंदर चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे मोटर अपघात रनि.नं.०१/२०१६ नोंदविण्यात आला.

३. सदर वर्दी जबाबावरुन पोलीस ठाणे राधानगरी येथे आरोपीविरूद्ध गुन्हा क्र.४२/२०१६ भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरूध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.कलम १८४ प्रमाणे नि.क्र.७ कडे गुन्हयाचा तपशिल नोंदविला व आरोपीस त्याचेविरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. आरोपी विरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने एकुण पाच साक्षीदारांची साक्षतपासणी नोंदविली. विशेष सरकारी वकील यांनी नि.क्र.४० कडे प्रथम खबर देणार यांच्या सहीची पुरसीस दाखल करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यात आरोपी विरुध्द आरोपसदृश्य कथने आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार चे निवेदन नि.क्र.४१ कडे नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या निवेदनामध्ये पुराव्यातील सर्व कथने नाकारुन प्रस्तुत गुन्हयातील अपघात हा बसचालकाच्या चुकीमुळे घडला असल्याचा बचाव घेतला आहे.

६. अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०६/०१/२०१६ रोजी दुपारी ०१.३० वाजताचे सुमारास राधानगरी–दाजीपुर रोडवर, मौजे शेळप, ता. राधानगरी येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.१०.बी.टी.६२१४ हे वाहन मानवी जिवीतास धोका पोहोचेल अगर अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे अथवा हयगयीने चालविले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.१०.बी.टी.६२१४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे, हयगयीने व अविचाराने चालवुन एस.टी.बस क्र.एम.एच.१४.बी.टी.३०६२ ला समोरुन धडक देवुन दोन्ही वाहनांचा अपघात करुन स्वतःला दुखापत पोहचविण्यास कारणीभूत ठरला व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.१०.बी.टी.६२१४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे, हयगयीने व अविचाराने चालवुन एस.टी.बस क्र.एम.एच.१४.बी.टी.३०६२ ला समोरुन धडक देवुन दोन्ही वाहनांचा अपघात करुन सदर अपघातामध्ये स्वतःला गंभीर दुखापती पोहचविण्यास कारणीभूत ठरला व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.१०.बी.टी.६२१४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे, हयगयीने व अविचाराने चालवुन एस.टी.बस क्र.एम.एच.१४.बी.टी.३०६२ ला समोरुन धडक देवुन अपघातामधील दोन्ही वाहनांचे नुकसान केले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ५. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.१०.बी.टी.६२१४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे व धोकादायकरितीने चालविले व त्यान्वये मोटर वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

८. आरोपीतर्फे प्रस्तुत प्रकरणातील जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र.३९ मान्य करण्यात आलेले आहे.

## का र ण मि मां सा

**विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ बाबत**:-

९. विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ एकमेकांशी सुसंगत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदवित आहे.

१०. आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात एकुण पाच साक्षीदारांची साक्षतपासणी नोंदविण्यात आली. सदर साक्षीदारांपैकी, संजीव (अ.सा.क्र.३) हे प्रस्तुत अपघातामधील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत व युवराज (अ.सा.क्र.४) हे प्रस्तुत प्रकरणातील घनास्थळ पंच साक्षीदार आहेत. असे असुन देखील सदर दोन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. विशेष सरकारी वकील यांनी परवानगीनंतर सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु त्यामधुन देखील अभियोगपक्ष आरोपी विरुध्दचा कोणताही पुरावा अभिलेखावर आणु शकला नाही. त्यामुळे संजिव (अ.सा.क्र.३) व युवराज (अ.सा.क्र.४) यांचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

११. तसेच अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले अनिल (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये शेळप-बांबर येथे त्यांची बस आली असता त्यांना मोठ्याने धडक झाल्याचा आवाज आल्याने त्यांनी बसमधुन खाली उतरुन पाहीले असता तेथे एक

मोटरसायकलस्वार जखमी अवस्थेत पडल्याचे त्यांना दिसल्याचे कथन केले. या व्यतीरीक्त अनिल (अ.सा.क्र.१) यांनी अपघाताबाबत कोणतीही विधाने केलेली नाहीत. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा देखील अभियोगपक्षास आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करणेकरीता पुरेसा उपयुक्त ठरत नाही.

१२. अभियोगपतर्फे तपासण्यात आलेले सागर (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले की, ते त्यांच्या ताब्यातील एस.टी. बस क्र.एम.एच.१४.बी.टी.३०६५ ने कणकवली कडून कोल्हापूरकडे जात असताना शेळप गावी वळणावरती एक मोटरसायकलस्वार समोरुन येताना त्यांना दिसला. त्याला वाचविण्यासाठी त्यांनी गाडी बाजुला घेतली होती. तरीदेखील सदर मोटरसायकलस्वार त्यांच्या बसला येवुन धडकला. त्यानंतर त्यांनी अपघाताबाबत राधानगरी पोलीस ठाणेत वर्दी दिली. अभियोगपक्षाने सागर (अ.सा.क्र.२) याच्या पुराव्यातून वर्दी नि.क्र.२९ शाबीत केली आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या सागर (अ.सा.क्र.२) याच्या उलटतपासामध्ये त्यांनी हे मान्य केले की, एस.टी ला कोण धडकले होते त्या व्यक्तीचे नाव त्यांना माहीत नाही. ज्या गाडीने त्यांच्या एस.टी ला धडक दिली होती त्या गाडीचा नंबर देखील त्यांना माहीत नाही. त्यांनी पुढे असे कथन केले की, ज्या ठिकाणी अपघात घडला त्या ठिकाणी एस आकाराचे वळण आहे. वळणाच्या ठिकाणी पाठीमागचे चाक रस्त्याखाली उतरु नये म्हणून बसची पुढील बाजू दुस–या बाजूला घ्यावी लागते. सागर (अ.सा.क्र.२) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्याला एस.टी ला धडकलेल्या व्यक्तीचे नाव किंवा ज्या मोटरसायकलने धडक दिली तिचा नंबर सांगता आलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अपघातामधील मोटरसायकल आरोपीच चालवित होता व त्याच्या चुकीमुळे अपघात झाला ही बाब सबळ पुराव्यानिशी शाबीत होत नाही. त्यामुळे सागर (अ.सा.क्र.२) याचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

१३. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले कृष्णात गुरव (अ.सा.क्र.५) हे प्रस्तुत प्रकरणातील तपसीअंमलदार तसेच फिर्यादी देखील आहेत. कृष्णात (अ.सा.क्र.५) यांच्या पुराव्यामधुन अभियोगपक्षाने तपास करणेबाबतचा आदेश नि.क्र.३६, आरोपीला दिलेली नोटीस नि.क्र.३७ व फिर्यादी जबाब नि.क्र.३८ अशी कागदपत्रे शाबीत केली आहे. परंतु आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये कृष्णात (अ.सा.क्र.५) यांनी प्रस्तुतचा गुन्हा नमुद आरोपीने केला होता व त्याच्या चुकीमुळेच अपघात घडला असे कोणतेही विधान केलेले नाही. तसेच कृष्णात (अ.सा.क्र.५) हे पोलीस कर्मचारी असुन ते स्वतंत्र असे साक्षीदार नाहीत. तसेच त्यांनी प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व तपासीअंमलदार अशी दोन्ही कर्तव्ये पार पाडलेली दिसता. अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या पुराव्यावर विसंबुन राहुन आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केला होता अस निष्कर्ष काढणे उचीत होणार नाही.

१४. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणा—या एस.टी बस ला धडक देवुन अपघात केला व सदर अपघातामध्ये स्वतःला दुखापती पोहचवुन अपघातामधील वाहणांचे नुकसाणीस कारणीभूत ठरला असा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. परिणामी, आरोपी विरुध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.कलम १८४ प्रमाणे असलेले आरोप पुराव्याअभावी शाबीत होत नाहीत. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.६ बाबत**:—

१५. वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष लक्षात घेता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी अभिजीत रामचंद्र साळवी यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटर वाहन अधिनियम कलम १८४ नुसार शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या तरतुदींचे अनुपालन करावे व त्यानुसार रक्कम रु.१५,०००/– चा वैयक्तिक व जमानत मुचलका निष्पादित करुन द्यावा.

***(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)***

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.04.06 15:57:57 +0530

**( आर. डि. शिंदे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
राधानगरी

ठिकाण : राधानगरी
दिनांक :०६/०४/२०२६

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**१) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी–**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | अनिल महादेव पाटील | साक्षीदार | १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | सागर परशुराम शिंदे | साक्षीदार | २८ |
| ३. | संजिव पांडूरंग शेडगे | साक्षीदार | ३२ |
| ४. | युवराज गणपती मांडरे | पंचसाक्षीदार | ३३ |
| ५. | कृष्णात ज्ञानदेव गुरव | फिर्यादी व तपासीअंमलदार | ३५ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी– निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी– निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)–**

**अ. अभियोग पक्ष निशाणी– निरंक**

**ब. बचाव पक्ष निशाणी– निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ७ | आरोपीचे निवेदन |
| ३. | ३९ | जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ४. | ४० | पुरावा संपलेची पुरसीस. |
| ५. | ४१ | आरोपीचे फौ.प्र.सं.कलम ३१३ प्रमाणे निवेदन. |

**ड. सामग्री वस्तू –** निरंक.